**MHSI**010006532011

## नियमित दिवाणी अपील क्र.१२३ सन २०११ मधील नि.१०९ खालील अर्ज

(प्रकाश शंकर गावडे व.२ विरुध्द अंबाजी पांडुरंग गावडे व.६९)

१.        अपिलकाराने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ अन्वये केलेला आहे.

२.        अपिलकाराचे म्हणणे थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

अपिलकाराच्या म्हणण्यानुसार, अपिलकाराने मालवण येथील दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) यांच्या न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्र. १३८/२००५ दाखल केलेला होता. हा दावा निकाली झाला. त्यातील निवाडयाविरुध्द प्रस्तुत अपील दाखल आहे. अपीलाचे कामकाज चालू असताना अपीलातील उत्तरवादी क्र. २,१३,१४ आणि ४४ अपीलाचे मिळकतीतील जंगली व इमारती झाडांची तोड कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव सुरु असताना करण्याच्या प्रयत्नात होते. अपिलकार क्र. १ यास त्याची चाहूल लागताच दि. १४.१२.२०२० रोजी तहसिलदार, मालवण यांच्याकडे अर्ज करुन त्याने झाडे तोडण्याची परवानगी देवू नये अशी तक्रार दिली होती. असे असताना, दि.०२.०१.२०२१ पासून उत्तरवादी क्र. २,१३,१४ आणि ४४ यांनी दावा मिळकतीतील जंगली आणि इमारती झाडे मजुराकरवी तोडण्यास सुरुवात केली. त्यावेळेस अपिलकार औषधोपचाराकरीता मुंबई येथे गेला होता.

३.        अपिलकाराच्या म्हणण्यानुसार, उत्तरवादीने अपिलकाराच्या परोक्ष आणि परवानगीविना महसूल अधिका–यांना हाताशी धरुन विभाजन करण्याचे गैरकृत्य चालू केले आहे. त्यामुळे अपिलाच्या मुदतीत त्याचेविरुध्द त्याने दावा मिळकतीतील शांततामय कब्जावहिवाटीस हरकत अडथळा करु नये, महसूल अधिका–यांना हाताशी धरुन महसूल दप्तरी फेरबदल करु नयेत अशी ताकीद होणे गरजेचे आहे. अपिलाच्या मुदतीत अशी ताकीद झाली नाही तर उत्तरवादी झाडे तोडून त्रयस्थांस विक्री करुन अपिलकाराचे नुकसान करणार आहेत व असे झाल्यास अपिलकाराची पैशाच्या रुपात भरुन न येणारी अशी अपरिमित हानी होणार आहे. सबब, उत्तरवादी क्र. १,१३,१४ व ४४ यांनी स्वतः अगर त्यांच्यातर्फे कोणाही व्यक्तीमार्फत झाडांची तोड करु नये, त्यांच्या शांततामय कब्जाभोग्यास हरकत करु नये, जमिनीचे क्षेत्र त्रयस्थांस विक्री करु नये वा जडजोखमात टाकू नये तसेच महसूल दप्तरी फेरबदल करुन घेवू नये अशी तुर्तातुर्त ताकीद मागितलेली आहे. ताकीद अर्जासोबत कागदांची यादी दाखल केलेली असून त्यामध्ये दि.१४.१२.२०२० रोजी तहसिलदार,

मालवण यांच्याकडे केलेल्या अर्जाची स्थळप्रत, छायाचित्रे व दि. ०६.०१.२०२१ रोजीची छायाचित्रे विकसित केल्याबाबतची पावती असे कागद दाखल केले आहेत.

४. उत्तरवादी क्र. १३ व १४ यांनी अर्जास म्हणणे दिलेले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्जातील सर्व कथने खोटी व खोडसाळ आहेत. उत्तरवादी क्र. १ हा मयत आहे व त्याच्याविरुध्द ताकीद मागितलेली आहे. अपिलकाराने दिवाणी दावा क्र. १३८/२००५ वाटपासाठी दाखल केला होता. प्रस्तुत अपिलातील उत्तरवादी क्र. १३ व १४ त्या अपिलाकामी प्रतिवादी क्र. ४२ व ४३ होते. हा दावा गुणदोषावर चालून न्यायालयामार्फत नामंजूर करण्यात आलेला आहे. उत्तरवादी क्र. १३ व १४ यांनी नोंदणीकृत खरेदीपत्राने अपिलातील मिळकती खरेदी घेतलेल्या आहेत. दाव्याच्या निर्णयानंतर जून, २०१२ मध्ये उत्तरवादी क्र. १३ व १४ यांनी त्यानी मागितलेल्या मिळकतीची विक्री केली आहे. अशा परिस्थितीत त्याचेविरुध्द खोडसाळपणे हा अर्ज करण्यात आलेला आहे. अपिलकाराचे म्हणण्यानुसार, उत्तरवादी क्र.१३, १४ व ४४ यांनी अर्जात नमूद मिळकतीचे नुकसान होईल असे कोणतेही कृत्य केलेले नाही, कोणतीही झाडे तोडलेली नाहीत, अर्जदाराने दाखल केलेली छायाचित्रे कोणत्या तारखेची, कोणत्या सालातील व कोणी काढली हे नमूद नाही. ही छायाचित्रे अपिलात नमूद जमिनीची नाहीत. अपिलकार यास सकृतदर्शनी अपिलात नमूद मिळकतीसंदर्भात केस नाही. सोईचा तूळ अपिलकाराच्या बाजूने नाही, अर्ज फेटाळल्यास अपिलकाराचे नुकसान होणारे नाही. सबब, अर्ज फेटाळावा.

५. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. उभय विधिज्ञांचे युक्तिवाद ऐकले. खालील मुद्दे विचारार्थ उपस्थित झाले असून त्यावरील माझे निष्कर्ष स्पष्टीकरणासह खालीलप्रमाणे आहेत.

| | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १ | अपिलकारास ताकीद देण्याकरीता सकृतदर्शनी केस आहे का? | | नाही. |
| २ | न्यायाचा समतोल अपिलकाराच्या बाजूने आहे ? | | नाही. |
| ३ | तुर्तातुर्त ताकीद न दिलेस अपिलकाराचे नुकसान होणारे आहे ? | | नाही. |
| ४ | आदेश का? | | अर्ज नामंजूर केला. |

## <u>स्पष्टीकरण</u>

**<u>मुद्दे क्र. १ ते ३:</u>–**

६. अर्जामध्ये उत्तरवादी क्र. २,१३,१४ व ४४ यांच्या तथाकथित गैरकृत्याविषयी कथन केलेले आहे. तथापि, ताकीद मागताना मात्र उत्तरवादी क्र. १,१३,१४, व ४४ यांच्याविरुध्द ताकीद

मागितलेली आहे. उत्तरवादी क्र.१ मयत असल्याने त्याचेविरुध्द ताकीद मागता येणार नाही. याठिकाणी असे नमूद करणे आवश्यक वाटते की, मूळ अर्जात उत्तरवादी क्र.२,१३,१४, व ४४ यांच्या गैरकृत्याबाबत कथन आहे. त्यामुळे विनंती कलमातील उत्तरवादी क्र. १ विरुध्द तुर्तातुर्त ताकीद मागण्याचे कारण नाही. सदर चूक हस्तदोषाने झालेली असावी असे मानता येवु शकते. अपिलकाराच्या म्हणण्यानुसार, उत्तरवादी क्र.२,१३,१४ व ४४ यांनी अपिलातील मिळकतीतील जंगली व इमारती झाडांची तोड चालू केलेली आहे. याठिकाणी असे नमूद करणे आवश्यक वाटते की, उत्तरवादी क्र. २,१३,१४ व ४४ यांनी जून, २०१२ मध्ये त्याच्या हिश्शाच्या मिळकतीची नोंदणीकृत खरेदीपत्राने विक्री केली आहे. या परिस्थितीमध्ये त्यांचा दावा मिळकतीशी संबंध उरलेला नाही. उत्तरवादी क्र. ४४ विरुध्द अपिलाचे काम एकतर्फी चालू आहे व तो या अपिलात हजर झालेला नाही.

७. प्राप्त परिस्थितीमध्ये हा ताकीद अर्ज उत्तरवादी क्र. २ आणि उत्तरवादी क्र. ४४ यांच्याबाबत विचारात घेणे आवश्यक आहे. तुर्तातुर्त ताकीद अर्जाचे कामी अपिलाकाराने या व्यक्ती अपिलाचे मिळकतीतील झाडांची तोड करीत आहेत असे कथन केलेले आहे. प्रत्यक्षात अर्ज दाखल करताना अपिलकाराने दोन छायाचित्रे हजर केलेली आहेत. त्यामध्ये काही जंगली झाडांची तोड झाली आहे असे दिसत आहे. ही छायाचित्रे कोणी कोणत्या साधनाने, कोणत्या तारखेस काढली याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल करण्यात आलेला नाही. तहसिलदार यांच्याकडे दिलेला अर्ज दि.१४.१२.२०२० रोजीचा आहे. या अर्जामध्ये जंगलतोड करण्यास परवानगी देवू नये आणि जंगलाची तोड करु नये असे नमूद केले आहे व प्रत्यक्षात ताकीद मागताना मात्र झाडांची तोड करु नये, दावा जमिनीचे क्षेत्र त्रयस्थास विक्री करु नये, महसूल दप्तरी फेरबदल करु नये व शांततामय कब्जाभोग्यास हरकत अडथळा करु नये अशी ताकीद मागितलेली आहे.

७. याठिकाणी असे नमूद करणे आवश्यक वाटते की, दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, मालवण यांच्या न्यायालयात अपिलकाराने केलेला वाटपाचा दावा नामंजूर करण्यात आलेला आहे. दावा नामंजूर केला असल्याने दावा, मिळकतीचे विभाजनासाठी तहसिलदार यांच्याकडे जाण्याचा प्रश्न उद्भवत नाही. उत्तरवादी क्र. १३ व १४ यांनी जून, २०१२ मध्ये त्यांच्या हिश्शाचे क्षेत्र नोंदणीकृत खरेदीपत्राने विकले आहे. त्यांच्या विधिज्ञांनी ७/१२ पत्रकी त्यांची नांवे पुर्वीच लागल्याचे नमूद केले आहे. सदर दाव्यात पारीत करण्यात आलेल्या हुकूमनाम्याविरुध्द अपिलकाराने अपील दाखल केले आहे. अपिलाच्या सुनावणीवेळेस सदर हुकूमनामा योग्य आहे अगर त्यामध्ये बदल करणे आवश्यक आहे याबाबतचा निर्णय गुणदोषावर होणार आहे.

८. आजमितीस दावा मिळकतीचे संदर्भात अपिलकाराचा हिस्सा ठरलेला नाही. अपिलकाराने ज्या उत्तरवादीविरुध्द ताकीद मागितलेली आहे, त्यापैकी दोन उत्तरवादींनी त्यांच्या

हिश्शाच्या मिळकती यापुर्वीच विक्री केल्या आहेत. त्यामुळे त्यांचा दावा मिळकतींशी काहीही संबंध उरलेला नाही. अपिलकाराने जी छायाचित्रे हजर केली आहेत. त्यामध्ये वृक्षतोड झालेली आहे असे आढळत आहे. त्यामुळे वृक्षतोड करु नये या मागणीस अर्थ उरलेला नाही. अपिलकाराने तुर्तातुर्त ताकीद अर्जाकामी जी ताकीद मागितली आहे ती ताकीद देण्यासाठी प्राप्त परिस्थितीत सकृत दर्शनी केस दिसत नाही. अशी ताकीद न दिल्याने अपिलकाराचे नुकसान होईल असे दिसत नाही. न्यायाचा समतोल अपिलकाराच्या बाजूने नाही. सबब, मी मुद्दयांची उत्तरे 'नकारार्थी' दिली आहेत व खालील आदेश करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. खर्च अंतिमतः धरण्यात यावा.

(आदेश खुल्या न्यायालयात उद्घोषित करण्यात आला.)

Digitally signed by
Varsharani Abhijit
Patravale
Date: 2021.02.05
17:28:19 +05'30'

दिनांकः ०५.०२.२०२१.

तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१,
सिंधुदुर्ग – ओरोस.